**Supported by**

IDRC | CRDI

International Development Research Centre
Centre de recherches pour le développement international

Canada

**Project Consortium**

ICLEI Local Governments for Sustainability · ATHENA INFONOMICS · CGIAR Research Program on Water, Land and Ecosystems · Led by: IWMI International Water Management Institute · Indian Institute of Technology Madras

# LOCAL NEWSPAPER ARTICLES FROM PROJECT CITIES



## २०20 पर्यंतचे उद्दिष्ट : कॅनडाच्या सहाय्याने आयसीएलईआय करणार काम

# हिप्परगा तलाव संवर्धनाचा आराखडा तयार करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : हिप्परगा तलावाच्या संवर्धनासाठी दक्षिण आशियातील देशांमध्ये काम करणारी आयसीएलईआय ही संस्था प्रकल्प आराखडा सादर करणार आहे. हा आराखडा लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येणार आहे. तलावाच्या संवर्धनाचे काम २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

आयसीएलईआयच्या वतीने येथील हॉटेल बालाजी सरोवरमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महापौर शोभा बनशेट्टी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

आणि जलव्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व प्रतिनिधींनी हिप्परगा तलावाच्या संवर्धनासाठी ३५ ते ४० उपाययोजना सुचविल्या.

या सूचनांचे सामाजिक, तांत्रिक, पर्यावरणीय मूल्यांकन करुन आयसीएलआयई एक प्रकल्प आराखडा तयार करणार आहे. हा आराखडा जिल्हाधिकारी,

### महापालिका, चार गावांच्या पाणीप्रश्नासाठीच काम

◆ हिप्परगा तलावातून शहराला पाणीपुरवठा होतो. शिवाय उत्तर सोलापूर तालुक्यातील काही गावांनाही पाणीपुरवठा होता. गेल्या काही वर्षांपासून उन्हाळ्यापूर्वी तलाव … आराखडा तयार करण… कार्यशाळा झाली होत… ग्रामपंचायत आणि म… ठेवण्याचा निर्णय झा…

### यापूर्वी केले नील…

सकाळ

# 'पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पथदर्शी प्रकल्प'

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. २ : सोलापूर शहर व जिल्ह्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे, अशी माहिती ईक्ली या संस्थेचे समन्वयक निखिल कुलकर्णी यांनी दिली.

शहरांचे आंतरराष्ट्रीय संघटन संस्थेच्या वतीने पर्यावरण स्थिरता ऊर्जा आणि बदलत्या हवामानातील घटक आणि जलसंवर्धनाच्या बाबतीत संवाद करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आयसीएलईआय आंतरराष्ट्रीय संघटन साऊथ एशिया या संस्थेच्या वतीने शहर तसेच ग्रामीण भागातील संवाद वाढविण्यासाठी हवामानातील बदल पर्यावरण स्थिरता ऊर्जा आणि जलसंवर्धनाच्या बाबतीत संवाद साधण्यासाठी ही कार्यशाळा झाली. महापौर शोभा बनशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. आयुक्त दीपक तावरे, उपायुक्त त्र्यंबक ढेंगळे-पाटील, जिल्हा परिषदेचे उपकार्यकारी अधिकारी विजय लोंढे उपस्थित होते.

श्री. लोंढे म्हणाले, "या प्रकल्पाचा भाग म्हणून या संस्थेमार्फत तळे हिप्परगा, हगलूर आणि एकरूख परिसराची पाहणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागात झाडे लावणे, जनजागृती करणे, कचरा विघटन आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे." आयुक्त श्री. तावरे म्हणाले, "शहरातील सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, एनजीओ अशा विविध संस्थांनी एकत्र येऊन पाण्याचा प्रश्न कशाप्रकारे सुटेल याबाबत नियोजन करावे." दुहेरी जलवाहिनीच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. लवकरच त्याचे काम होईल, असे महापौरांनी सांगितले.

सोलापूर : 'आयसीएलईआय' संस्थेतर्फे आयोजिलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन करताना महापौर शोभा बनशेट्टी. या वेळी आयुक्त दीपक तावरे, विजय लोंढे, त्र्यंबक ढेंगळे-पाटील, गंगाधर दुलंगे.

Solapur, Main
03/03/2019 Page No. 2

सोलापूर : 'लिकेज डिटेक्शन मशिन'च्या साह्याने विजापूरवेस परिसरातील जलवाहिनीला झालेली गळती मंगळवारी पहाटे पाच वाजता शोधताना 'इकली'चे प्रतिनिधी आशू प्रजापती. या वेळी जी. एन. दुलंगे, व्यंकटेश चौबे व एस. एस. उत्सुरगे. (सकाळ छायाचित्रसेवा)

# शहरांतर्गत मुख्य जलवाहिनींना चार ठिकाणी पाणी गळती

## 'लिकेज डिटेक्शन मशिन'च्या साह्याने पहाटे केली तपासणी

ऑन दि स्पॉट

सकाळ वृत्तसेवा

दिले. त्यानुसार प्रस्ताव तयार करून, संबंधित ठिकाणची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

'इकली' या संस्थेच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात

प्रतिनिधी शरद वाघ, गीता संदल उपस्थित होते. पहाटेच्या वेळी असलेल्या तुरळक वाहतुकीमुळे गळतीची ठिकाणे निश्चित करणे सोपे झाले.

### अशी कळते गळती

सरकारकडे १…

सोलापूर, ता. २५ : शहरातील न… पाण्याची मागणी केली आहे. जून २०… त्यामुळे आता संपूर्ण शहरातील नागरिकां…

थोडक्या…

# INTEGRATED RURAL URBAN WATER MANAGEMENT

# FOR

# CLIMATE BASED ADAPTATIONS IN INDIAN CITIES

# (IAdapt)

---

## Local Newspaper Articles from Project cities

### Solapur and Vijaywada

| | |
|---|---|
| **Proposal Code:** | **Proposal # A-69683** |
| **Submitted to:** | International Development Research Centre (IDRC)<br>Canada |
| **Submitted by:** | ICLEI South Asia |
| **Project Consortium:** | ICLEI South Asia (Lead Member)<br>Athena Infonomics LLC<br>International Water Management Institute (IWMI)<br>Indian Institute of Technology, Madras (IIT M) |

# Newspaper Articles from Solapur

**२०२० पर्यंतचे उद्दिष्ट : कॅनडाच्या सहाय्याने आयसीएलईआय करणार काम**

## हिप्परगा तलाव संवर्धनाचा आराखडा तयार करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : हिप्परगा तलावाच्या संवर्धनासाठी दक्षिण आशियातील देशांमध्ये काम करणारी आयसीएलईआय ही संस्था प्रकल्प आराखडा सादर करणार आहे. हा आराखडा लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येणार आहे. तलावाच्या संवर्धनाचे काम २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

आयसीएलईआयच्या वतीने येथील हॉटेल बालाजी सरोवरमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महापौर शोभा बनशेट्टी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. महापालिकेचे आयुक्त दीपक तावरे, उपायुक्त त्रिंबक ढेंगळे-पाटील, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय लोंढे, कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, आयसीएलईआयचे प्रकल्प अधिकारी निखिल कुलकर्णी, प्रकल्प समन्वयक श्रुती सादुखान, मोनालिसा सेन, गीता संदल, शहर समन्वयक शरद वाघ आदी उपस्थित होते. या कार्यशाळेला महापालिका, जिल्हा परिषद, जलसंपदा विभाग, जीवन प्राधिकरण, सोलापूर विद्यापीठ, विविध महाविद्यालयांतील तज्ज्ञ प्राध्यापक आणि जलव्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व प्रतिनिधींनी हिप्परगा तलावाच्या संवर्धनासाठी ३५ ते ४० उपाययोजना सुचविल्या.

या सूचनांचे सामाजिक, तांत्रिक, पर्यावरणीय मूल्यांकन करुन आयसीएलआयई एक प्रकल्प आराखडा तयार करणार आहे. हा आराखडा जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करण्यात येईल. या आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर संवर्धनाच्या काही कामांना कॅनडाच्या आयडीआर संस्थेकडून निधी मिळणार आहे. पण तो किती असेल, याची स्पष्टता नसल्याचे निखिल कुलकर्णी यांनी सांगितले. पण आराखड्यातील बहुतांश कामे महापालिका, जिल्हा परिषदेसह इतर योजनांमधून करणे शक्य आहे. ती त्याचवेळी सांगण्यात येतील, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.



### महापालिका, चार गावांच्या पाणीप्रश्नासाठीच काम

◆ हिप्परगा तलावातून शहराला पाणीपुरवठा होतो. शिवाय उत्तर सोलापूर तालुक्यातील काही गावांनाही पाणीपुरवठा होता. गेल्या काही वर्षापासून उन्हाळ्यापूर्वी तलाव कोरडा पडत आहे. त्यामुळे त्याच्या संवर्धनासाठी प्रकल्प आराखडा तयार करण्याचे निश्चित झाले. मे २०१८ मध्ये या संदर्भात पहिली कार्यशाळा झाली होती. या कार्यशाळेतून तळेहिप्परगा, हगलूर, एकरुख ग्रामपंचायत आणि महापालिकेतील पाणीपुरवठा विभागाशी समन्वय ठेवण्याचा निर्णय झाला होता, असेही कुलकर्णी यांनी सांगितले.

### यापूर्वी केले नीलमनगर येथे काम

◆ आयसीएलईआय संस्थेने यापूर्वी नीलमनगर भागात पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण प्रकल्प राबविला. या अंतर्गत २० घरांची निवड करण्यात आली. तीन बोअरवेलचे पुनर्भरण करण्यात आले. या कामासाठी युरोपिय महासंघाने मदत केली होती.

About 1st RURBAN Meeting in Solapur

सकाळ

# 'पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पथदर्शी प्रकल्प'

**सकाळ वृत्तसेवा**

सोलापूर, ता. २ : सोलापूर शहर व जिल्ह्यातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे, अशी माहिती ईकली या संस्थेचे समन्वयक निखिल कुलकर्णी यांनी दिली.

शहरांचे आंतरराष्ट्रीय संघटन संस्थेच्या वतीने पर्यावरण स्थिरता ऊर्जा आणि बदलत्या हवामानातील घटक आणि जलसंवर्धनाच्या बाबतीत संवाद करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आयसीएलईआय आंतरराष्ट्रीय संघटन साऊथ एशिया या संस्थेच्या वतीने शहर तसेच ग्रामीण भागातील संवाद वाढविण्यासाठी हवामानातील बदल पर्यावरण स्थिरता ऊर्जा आणि जलसंवर्धनाच्या बाबतीत संवाद साधण्यासाठी ही कार्यशाळा झाली. महापौर शोभा बनशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. आयुक्त दीपक तावरे, उपायुक्त त्र्यंबक ढेंगळे-पाटील, जिल्हा परिषदेचे उपकार्यकारी अधिकारी विजय लोंढे उपस्थित होते.



**सोलापूर : 'आयसीएलईआय' संस्थेतर्फे आयोजिलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन करताना महापौर शोभा बनशेट्टी. या वेळी आयुक्त दीपक तावरे, विजय लोंढे, त्र्यंबक ढेंगळे-पाटील, गंगाधर दुलंगे.**

श्री. लोंढे म्हणाले,''या प्रकल्पाचा भाग म्हणून या संस्थेमार्फत तळे हिप्परगा, हगलूर आणि एकरूख परिसराची पाहणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण भागात झाडे लावणे, जनजागृती करणे, कचरा विघटन आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.'' आयुक्त श्री. तावरे म्हणाले, ''शहरातील सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, एनजीओ अशा विविध संस्थांनी एकत्र येऊन पाण्याचा प्रश्न कशाप्रकारे सुटेल याबाबत नियोजन करावे.'' दुहेरी जलवाहिनीच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. लवकरच त्याचे काम होईल, असे महापौरांनी सांगितले.

Solapur, Main
03/03/2019 Page No. 2

About 2nd RURBAN Meeting in Solapur



सोलापूर : 'लिकेज डिटेक्शन मशिन'च्या साह्याने विजापूरवेस परिसरातील जलवाहिनीला झालेली गळती मंगळवारी पहाटे पाच वाजता शोधताना 'इकली'चे प्रतिनिधी आशु प्रजापती. या वेळी जी. एन. दुलंगे, व्यंकटेश चौबे व एस. एस. उत्सुरगे. (सकाळ छायाचित्रसेवा)

# शहरांतर्गत मुख्य जलवाहिनींना चार ठिकाणी पाणी गळती

## 'लिकेज डिटेक्शन मशिन'च्या साह्याने पहाटे केली तपासणी

**ऑन दि स्पॉट**

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. २५ : खोदाई न करताही जलवाहिनीला गळती शोधण्यासाठी मंगळवारी पहाटे चार ते सहा यावेळेत विजापूरवेस परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. त्यासाठी 'लिकेज डिटेक्शन मशिन'चा वापर करण्यात आला. तपासणीदरम्यान विजापूरवेस, डॉफरी टाकी, गुरुनानक चौक परिसर आणि सिद्धेश्वर चौक या चार ठिकाणी गळती असल्याचे 'सिग्नल' मशिनने दिले. त्यानुसार प्रस्ताव तयार करून, संबंधित ठिकाणची दुरुस्ती करण्यात येणार आहे.

'इकली' या संस्थेच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात आली. सिलीगुडी महापालिकेने या पद्धतीने तपासणी मोहीम राबविल्याने अनेक ठिकाणी खोदाई टळली. ज्या ठिकाणी 'सिग्नल' दाखवले त्या ठिकाणी खोदाई करण्यात आली. त्यामुळे अनावश्यक खर्च टळला. त्याच धर्तीवर सोलापूर महापालिकेनेही ही मोहीम राबविण्याचे नियोजन केले. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य अभियंता जी. एन. दुलंगे, उपअभियंता व्यंकटेश चौबे, एस. एस. उत्सुरगे, 'इकली'चे प्रतिनिधी शरद वाघ, गीता संदल उपस्थित होते. पहाटेच्या वेळी असलेल्या तुरळक वाहतुकीमुळे गळतीची ठिकाणे निश्चित करणे सोपे झाले.

पर्यावरणीय स्थिरता, ऊर्जा आणि हवामानातील बदल यासारख्या विषयावर इकली ही संस्था काम करते. कॅनडातील इंटरनॅशनल डेव्हलपमेंट रिसर्च सेंटर या संस्थेच्या सहकार्याने विजयवाडा आणि सोलापूर येथे एकात्मिक जल संधारण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचा भाग म्हणून ही तपासणी मोहीम राबविण्यात आली. 'डीएनआर-१८' या यंत्राच्या साह्याने तपासणी करण्यात आली.

**अशी कळते गळती**

ज्या ठिकाणाहून जलवाहिनी गेली आहे, त्या ठिकाणी रस्त्यावरून 'डिटेक्शन यंत्र' फिरवण्यात येते. गळती नसल्याच्या ठिकाणी काहीच आवाज येत नाही, ज्या ठिकाणी गळती आहे, त्या ठिकाणी मात्र 'धबधब्या'सारखा आवाज येतो. गळतीचे प्रमाण जितके मोठे, तितका आवाज मोठा येतो. त्यानंतर गळतीचे स्थान निश्चित केले जाते.

About Acoustic water leak detection training program in Solapur

# तळेहिप्परगाचे सरपंच उज्ज्वला रेवजेंचा गौरव

उ. सोलापूर/प्रतिनिधी



जर्मनीच्या इकली या संस्थेच्यावतीने नवी दिल्ली येथील सूर्या हॉटेलमध्ये तळे हिप्परगा गावात पाणी व्यवस्थापन व नियोजन ह्या सामाजिक विषयावर विशेष उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सरपंच उज्ज्वला अजय रेवजे यांचा इकलीचे संस्थापक अध्यक्ष जे कुमार, संचालक श्रीवास्तव, नंदुरबारचे जिल्हाधिकारी राजेंद्र भारूड यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वायचळ, महापौर शोभा बनशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापूर जागतिक परिषदेसाठी महाराष्ट्रातून उत्तर तालुक्यातील तळे हिप्परगा हे निवडण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात तळेहिप्परगा येथे इकली संस्थेच्या वतीने पाणी व्यवस्थापनावर काम सुरु आहे. सोलापूर जिल्ह्यात सांडपाणी व्यवस्थापन, सोलापूर जिल्ह्यात झालेले शोषखड्डेयुक्त गाव या अभियानाची माहिती यावेळी दिली. या जागतिक परिषदेमध्ये आयआयटीने सोलापूर मधील सांडपाणी, शोषखड्ड्यांच्या मॉडेलचे सादरीकरण करण्यात आले.

## चांगल्या कामाची पावती

जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी वायचळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी लोंढे, सचिन जाधव ह्यांच्यामुळे मला आज आंतरराष्ट्रीय परिषदेत माहिती सादर करण्याची संधी मिळाली असून, यापुढे मी तालुका व जिल्हाभर काम करणार आहे. चांगले काम केल्याची पावती या निमित्ताने या परिषदेतून मिळाली.

– उज्ज्वला रेवजे, सरपंच तळेहिप्परगा

About participation of village Talehippaga in an international conference under IAdapt, New Delhi



लोकमत

ग्रामपंचायतीला आर्थिक मदत: जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित

# हिप्परगा गावातील सांडपाणी शुद्ध करून शेतीसाठी देणार...!

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : हिप्परगा गावातून हिप्परगा तलावात जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून, हा प्रकल्प जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. आता हे प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

हिप्परगा तलावातील पाण्यावर सोलापूर शहराची तहान भागवली जाते. गतवर्षी पावसाअभावी तलावात पाणी आले नव्हते. पण यंदा अतिवृष्टीमुळे उजनी धरणाचे पाणी व परिसरातील पाण्याने तलाव बऱ्यापैकी भरला आहे. हा तलाव महापालिकेच्या हद्दीबाहेर असला तरी शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेसाठी देखभाल ठेवली जाते. या तलावात हिप्परगा गावातील सांडपाणी जाऊ लागल्याने पिण्याचे पाणी दूषित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. पण सांडपाण्यावर प्रक्रिया केंद्र उभारण्याची क्षमता ग्रामपंचायतीची नव्हती. ग्रामपंचायतीच्या या समस्येसाठी इक्ली या एशिया संस्थेने मदत केली. गेल्या तीन वर्षांत सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. हा प्रकल्प पूर्णत्वास गेला आहे.

या संस्थेने हा प्रकल्प जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केला. यावेळी महापौर श्रीकांचना यन्नम, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश वायचळ, महापालिका आयुक्त दीपक तावरे, संस्थेचे कार्यकारी संचालक इमानी कुमार, वेदोश्रुती मादुरवार (?), गीता संदल, निखिल कुलकर्णी, सार्वजनिक आरोग्य अभियंता संजय धनशेट्टी, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे जिल्हा समन्वयक सचिन जाधव उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी वायचळ यांनी भारतीय शहरांमध्ये हवामानावर आधारित अनुकूलतेसाठी एकात्मिक ग्रामीण शहरी पाणी व्यवस्थापन हा इंटरनॅशनल डेव्हलपमेंट रिसर्च सेंटरमार्फत हा प्रकल्प राबविण्यात आला. ही संस्था, जिल्हा परिषद व महापालिकेने करार केला. पाणलोट क्षेत्राचा पाणी सुरक्षिततेत सुधारणा करण्यासाठी ज्या उपाययोजना सुचविल्या होत्या त्यातून मागील तीन वर्षांतून हा प्रकल्प अमलात आणला गेल्याचे सांगितले. यासाठी तळेहिप्परगा ग्रामपंचायत, जलसंपदा, कृषी, भूजल विभाग, दयानंद कॉलेज व इतर शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. या प्रकल्पातून महापालिकेच्या तीन शाळांच्या छतावरील पावसाच्या पाण्याचे जलपुनर्भरण करण्यात आले आहे.

## असा आहे प्रकल्प

- हिप्परगा गावातील सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत पाण्याचे तीन टप्प्यात स्थिरीकरण करून पाणी शुद्ध केले जात आहे. ग्रामपंचायतीच्या उघड्या गटारातून दररोज ४ हजार लिटरपेक्षा अधिक सांडपाणी या प्रकल्पात येत आहे. सांडपाण्याचे शुद्धीकरण करून हे पाणी वृक्ष संगोपनासाठी वापरले जाणार आहे. या संस्थेने विजयवाड्यानंतर महाराष्ट्रात तळेहिप्परगा येथे हा प्रकल्प उभा केला आहे.

## पाण्याचे प्रदूषण थांबले

- हिप्परगा तलावात येणारे सांडपाणी आता थांबले आहे. त्यामुळे पिण्यासाठी संरक्षित असलेले तलावातील पाण्याचे प्रदूषण थांबण्यास मदत झाली आहे. हिप्परगा ग्रामपंचायत आता या प्रकल्पाची देखभाल करणार आहे. प्रक्रिया केलेले पाणी झाडांच्या संगोपनासह शेतकऱ्यांनाही पुरविण्याचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

Hello Solapur
Page No. 2 Mar 12, 2020
Powered by: erelego.com

About 3rd RURBAN Meeting and pilot project handover in Solapur

## Newspaper articles from Vijaywada


# నీటి సంరక్షణ ప్రతిఒక్కరి బాధ్యత

...కడియాల...

About training program in Vijaywada

ఈనాడు

July 12, 2018

# నీటి కాలుష్యాన్ని అరికట్టాల్సిందే

గన్నవరం, న్యూస్‌టుడే : [illegible]



ప్రసంగిస్తున్న ఎంపీపీ కవిత

About training program in Vijaywada